# महाराष्ट्र विधानसभा

## दिवसाच्या कामकाजाचा क्रम

## बुधवार, दिनांक ८ जुलै, २०२६

## ( सकाळी ०९-३० ते १०-४५ वाजेपर्यंत )

**लक्षवेधी सूचना (म.वि.स. नियम १०५ अन्वये) :-**

(१) **श्री.अमोल खताळ, वि.स.स. पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे उप मुख्यमंत्री (नगरविकास) यांचे लक्ष वेधतील :-**

"अहिल्यानगर जिल्ह्यातील संगमनेर नगरपालिकेमार्फत सन २००९ मध्ये केंद्र शासनाच्या UIDSSMT योजनेअंतर्गत सुधारित पाणीपुरवठा योजना राबविण्यात येणे, सदर योजनेची मूळ अंदाजित किंमत रुपये ८ कोटी ७८ लाख इतकी असताना सुधारित अंदाजपत्रकानुसार रुपये ९ कोटी २९ लाख निश्चित करण्यात येणे, मात्र दिनांक ०१ एप्रिल, २००९ रोजीच्या ठरावान्वये सदर कामाची निविदा तब्बल ६९ टक्के जादा दराने मंजूर करून रुपये १५ कोटी ४० लाख खर्चास मान्यता देण्यात येणे, महाराष्ट्र नगरपालिका अधिनियमातील तरतुदींनुसार इतक्या जादा दराने निविदा मंजूर करणे अयोग्य असताना फेरनिविदा न मागविता संबंधित ठेकेदारास लाभ मिळवून देण्याच्या उद्देशाने नियमबाह्य पद्धतीने निर्णय घेण्यात आल्याचा संशय निर्माण होणे, परिणामी नगरपालिकेस सुमारे ६ कोटी ९१ लाख रुपयांचे अतिरिक्त आर्थिक नुकसान होणे, तसेच तत्कालीन नगराध्यक्ष, मुख्याधिकारी, संबंधित लोकप्रतिनिधी व अधिकाऱ्यांच्या भूमिकेबाबत गंभीर प्रश्न उपस्थित होणे, या संपूर्ण प्रकरणाची उच्चस्तरीय चौकशी करून दोषींवर कठोर कारवाई करण्याबाबत शासनाने केलेली वा करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

(२) **सर्वश्री प्रकाश सुर्वे, मंगेश कुडाळकर, मुरजी पटेल, अशोक पाटील, श्रीमती मनिषा चौधरी, वि.स.स. पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे उप मुख्यमंत्री (नगरविकास) यांचे लक्ष वेधतील :-**

"मुंबई उपनगरातील दहिसर पूर्व जकात नाका येथे महानगरपालिकेमार्फत ट्रान्सपोर्ट हब तयार करण्याचे कंत्राट न्याती इंजिनिअर्स व कन्सल्टंट यांना दिले असून मे.सोली व आर्कोह हे प्रोजेक्ट कन्सल्टंट असणे, सदरचे कामाकरिता खोदकाम करतांना डोटोनेटर्स वापरत असल्याने आसपासच्या इमारतींना तडे जात असून ज्येष्ठ नागरिकांच्या कानाला दडे बसत असून काही जेष्ठ नागरिकांच्या कानाची शस्त्रक्रिया होणे, तसेच हा प्रकल्प संजय गांधी राष्ट्रीय उदयानाजवळ असून या उद्यानातील वन्य प्राण्यांनाही त्रास होत असणे, या प्रकल्पाच्या

सभोवताली असणा-या स्थानिकांना धमकावून दादागिरी करुन काम सुरु ठेवणे, या स्थळ पाहणी दरम्यान आढळून आलेल्या त्रूटींच्या अनुषंगाने सदरहू काम नियमबाहय पध्दतीने कंत्राटदारामार्फत सुरु असल्याचे निदर्शनास येणे, यासंदर्भात नागरिकांकडून प्राप्त तक्रारींनुसार दि.३०.५.२०२६ रोजी सदस्य सचिव, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने प्रत्यक्ष स्थळ पाहणी करणे, याकरिता राज्य व केंद्रीय पर्यावरण विभागाने दि.१७.१०.२०२५ च्या पत्रामध्ये सूचित केल्यानुसार त्यांचे पालन प्रत्येक सहा महिन्याचा अहवाल खात्यांना सादर न करणे, पर्यावरण संरक्षण कायदा १९८६ नुसार डाटा सादर करणे आवश्यक असतांनाही तोही सादर न करणे, वृक्ष प्राधिकरण, विमानतळ प्राधिकरण व इतर संबधित यंत्रणांच्या परवानग्या प्राप्त होण्याआधीच कामास सुरुवात करणे,काम सुरु होण्यापूर्वी या भूखंडावर ६११ झाडांचे वृक्षारोपण करणे बंधनकारक असतांनाही एकही झाड न लावणे, गौणखनिजांची विल्हेवाट लावण्याच्या प्रक्रियेचे पालन न करणे, कामगार व इतर अधिकारी यांच्याकरिता सुसज्ज प्रसाधनगृहाची व्यवस्था तसेच अन्य सुरक्षा व्यवस्था न करणे, खोदकामादरम्यान येणारे पाणी याचा उपसा करण्याची परवानगी विभाग कार्यालयाकडून न घेणे, तसेच खोदकामादरम्यान उपलब्ध होणारी सुपीक माती तसेच प्राप्त होणारे दगड उत्कृष्ट प्रतीचे शासकीय संपत्ती असतांना याचा वापर, नियोजन व त्यांचे ट्रान्सपोर्ट करणे याकरिता विहित प्रक्रियेचे पालन न करणे, सुर्यास्तानंतर काम सुरु ठेवणे, पावसाळयात खोदकाम परिसरातील पाणी काढण्याची व्यवस्था नसणे, अशा अनेक त्रुटी या अहवालात नमूद करणे, यासंदर्भात शासनाने चौकशी करुन संबधित कंत्राटदारावर कारवाई करुन सदर प्रकल्प संबधित कंत्राटदारांचे कंत्राट रद्द करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

**(३) श्री.संजय मेश्राम, वि.स.स. पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे उप मुख्यमंत्री (नगरविकास) यांचे लक्ष वेधतील :-**

"उमरेड नगरपरिषदेकडून सन २०२६-२७ ते २०२९-३० या कालावधीसाठी प्रस्तावित करण्यात आलेल्या वाढीव मालमत्ता करासह घनकचरा कर, शिक्षण उपकर, अग्निशमन कर, स्वच्छता कर, दिवाबत्ती कर व इतर विविध कर आकारणीमुळे शहरातील नागरिकांमध्ये तीव्र असंतोष निर्माण होणे, सदर प्रस्तावित कर आकारणीमुळे सुमारे २१,७५६ मालमत्तांवर थेट आर्थिक भार पडत असणे, आधीच महागाई, बेरोजगारी, शेतीतील संकटे व वाढत्या जीवनावश्यक खर्चामुळे त्रस्त असलेल्या सर्वसामान्य नागरिकांवर अतिरिक्त आर्थिक बोजा पडत असल्याचे निदर्शनास येत असणे, तसेच शहरातील अनेक भागांमध्ये रस्ते, नाल्या,पिण्याचे पाणी, स्वच्छता व स्ट्रीट लाईट यांसारख्या मूलभूत नागरी सुविधांची कमतरता असल्याने करवाढ अन्यायकारक ठरत असल्याचे नागरिकांकडून मत व्यक्त होत असणे, नगर परिषदेने कर पुनर्मूल्यांकन प्रक्रियेत नागरिकांचा सहभाग न घेता तसेच हरकती व सूचना विचारात न घेता एकतर्फी पद्धतीने निर्णय घेतल्याचे निदर्शनास येत असून संपूर्ण प्रक्रिया अपारदर्शक स्वरूपाची असल्याची भावना निर्माण होत असल्याचे दिसून येत असणे, या

पार्श्वभूमीवर प्रस्तावित वाढीव मालमत्ता कर, घनकचरा कर, शिक्षण उपकर व इतर सर्व अतिरिक्त कर तात्काळ रद्द करणे, नागरिक व लोकप्रतिनिधी यांची संयुक्त बैठक घेणे, सर्व हरकती विचारात घेऊन पारदर्शक पद्धतीने अंतिम कर निर्धारण करणे तसेच संपूर्ण प्रक्रियेची पुर्नतपासणी करून न्याय्य कर धोरण लागू करण्याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही, उपाययोजना व शासनाची प्रतिक्रिया."

**(४) श्रीमती मनिषा चौधरी, वि.स.स. पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे उप मुख्यमंत्री (नगरविकास) यांचे लक्ष वेधतील :-**

"मुंबई शहरामध्ये पावसाळ्याच्या काळात वृक्ष उन्मळून पडणे तसेच मोठ्या फांद्या तुटून पडण्याच्या घटनांमध्ये सातत्याने वाढ होत असून त्यामुळे नागरिकांच्या जीवित व वित्तास गंभीर धोका निर्माण झाला असणे, मुसळधार पाऊस, ताशी ४० ते ६० कि.मी. वेगाचे वादळी वारे, पाण्याने संतृप्त झालेली जमीन, अत्यंत मर्यादित जागेमुळे वृक्षांच्या मुळांची अपुरी वाढ, भूमिगत सेवा वाहिन्यांसाठी वारंवार होणारे खोदकाम तसेच वृक्षांतील अंतर्गत कुज व संरचनात्मक दोष यांमुळे अशा घटनांमध्ये वाढ होत असणे, दाट लोकवस्तीच्या भागात रस्ते, पदपथ, बसथांबे व निवासी परिसरात वृक्ष अथवा फांद्या कोसळून जीवित व वित्तहानी होण्याची शक्यता वाढली असणे, मुंबईतील सर्व वृक्षांचे शास्त्रीय जोखीम मूल्यमापन (Risk Assessment) करून धोकादायक वृक्षांची तातडीने ओळख करणे, आवश्यक त्या ठिकाणी शास्त्रीय वृक्षछाटणी करणे, वृक्षांच्या मुळांचे संरक्षण, अनावश्यक कॉंक्रीटीकरण हटविणे, भूमिगत सेवा वाहिन्यांच्या कामांचे योग्य नियोजन करणे तसेच प्रत्येक प्रभागात वृक्षतज्ज्ञांच्या मार्गदर्शनाखाली Urban Tree Risk Management (शहरी वृक्ष जोखीम व्यवस्थापन) ही शास्त्रीय प्रणाली विकसित करुन नियमित तपासणी व डिजिटल वृक्ष व्यवस्थापन प्रणाली कार्यान्वित करून नागरिकांच्या सुरक्षिततेसह वृक्षसंवर्धनासाठी प्रभावी कार्यवाही करण्याची आवश्यकता, यावर शासनाने करावयाची कार्यवाही वा उपाययोजना."

**(५) श्री.बाबुराव कदम-कोहळीकर, वि.स.स. पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे महसूल मंत्र्यांचे लक्ष वेधतील :-**

"हदगाव व हिमायतनगर हे दोन्ही तालुके प्रशासकीय, शैक्षणिक, वैद्यकीय तसेच दळणवळणाच्या दृष्टीने नांदेड जिल्हा मुख्यालयाशी अत्यंत जवळ व नैसर्गिकरीत्या संलग्न असणे, किनवट अप्पर जिल्हाधिकारी कार्यालयात या तालुक्यांचा प्रस्तावित समावेश केल्यास नागरिकांना जवळपास १४२ कि.मी. पर्यंतचे अंतर पार करावे लागून मोठ्या प्रमाणावर गैरसोय निर्माण होणे, तसेच या भागातील किनवट हे हदगाव व हिमायतनगर तालुक्यांपासून सुमारे ११० ते १२० कि.मी. अंतरावर असून काही गावांमधून हे अंतर अजून जास्त असणे, हदगाव तालुक्यातील शेवटचे गाव शिऊर कॅम्प येथून किनवटचे अतंर सुमारे १४२ कि.मी. तर नांदेड हे सुमारे ६५ कि.मी. अंतरावर असून हदगाव तहसील पासून किनवटचे

अंतर सुमारे १०२ कि.मी. असल्याने नागरिकांना शासकीय कामांसाठी मोठा प्रवास करावा लागत असून अतिरिक्त आर्थिक खर्च देखील वाढणे, यासाठी हदगाव व हिमायतनगर तालुक्यांचा प्रशासकीय संबंध नांदेड जिल्हा मुख्यालयाशीच अधिक सुसंगत असल्याने त्यांचा समावेश किनवट अप्पर जिल्हाधिकारी कार्यालयात न करता नांदेड जिल्हाधिकारी कार्यालयाकडेच कायम ठेवून सर्व मार्गांची तातडीने दुरुस्ती व दर्जोन्नती करण्याबाबत शासनाने केलेली वा करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

**(६) श्री.अनुपभैय्या अग्रवाल, वि.स.स. पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे महसूल मंत्र्यांचे लक्ष वेधतील :-**

"धुळे जिल्ह्यातील धुळे शहर व शहरालगत वडजाई येथे गट नं सर्व्हे नं.१०९, दस्त क्र. २५११/२०१३/ वडजाई येथील गट नं सर्व्हे नं.१६०/२, दस्त क्र.१६६६/२०२०, वडजाई येथील गट नं सर्व्हे नं.१३४/३, दस्त क्र. ४५५८/२०१२ व गट व सर्व्हे क्र. १८०/१, दस्त क्र.५२१४/२०१२, तसेच पिंपरी येथील गट/सर्व्हे क्र.५८/२ दस्त क्र. २९६५/२०११ व गट/सव्हे ९८/२ अ,दस्त क्र.२९६४/२०२१, पिंपरी सर्वे नं. १०८/२अ, सर्व्हे क्र. ९२, गट/सर्व्हे क्र.७०/५, तसेच नरव्हाळ येथील गट/सर्व्हे नं.९/३ ब-२, तसेच देवपूर येथील सिटी सर्व्हे नं. ३६५६ व ३६५७, या जागा खरेदी करताना शेतकऱ्यांच्या जागा बिगर शेतक-यांनी खरेदी केल्या असणे, महाराष्ट्र कुळ कायदा जमिन नियम क्र.१९४८ चे कलम ६३ चे उल्लंघन झाल्याने या गैर शेतकरी व्यक्तींकडे बेकायदेशीर हस्तांतरण झालेली जमीन कलम ८३ सी अंतर्गत सदर व्यवहार अवैध घोषित होणे, धुळे शहरातील नगररचना क्र.१ मधील फायनल प्लॉट नं.७९ अ मधील मुळ मालकाने विकलेली जमीन पुन:श्च वारस लावून विशिष्ठ समाजाने जमीन बळकाविण्याच्या उद्दीष्टाने केलेला गैरव्यवहार जिल्हा भूमिअधिक्षक यांनी त्यांच्या आदेशामध्ये खरे ठरविले असणे, वरील सर्व प्रकरणाची सखोल चौकशी करुन बिगर शेतकरी यांनी इतर राज्यातून आणलेले शेतीचे उतारे याचीही चौकशी करुन त्याचा अहवाल शासन सादर करणे, यावर शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रीया."

**(७) श्री.नितीन पवार, श्रीमती देवयानी फरांदे, ॲड राहूल ढिकले, वि.स.स. पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे महसूल मंत्र्यांचे लक्ष वेधतील :-**

"ब्रिटिश सरकारने १९४३ मध्ये ख्रिश्चन समाजाच्या विकासासाठी शासकीय जागा नाशिक डायोसेशन ट्रस्ट असोसिएशन लिमिटेड या कंपनीला कलम ८ अंतर्गत सामाजिक प्रयोजनांसाठी दिली असणे, १९५८ मध्ये धर्मदाय संस्था अधिनियम अस्तित्वात आल्यानंतर नाशिक डायोसेशन ट्रस्ट नावाची धर्मदाय संस्था निर्माण करण्यात येणे, जमिनीचा विनियोग यानंतर या धर्मदाय संस्थेमार्फत केला जाणे, २०१६ मध्ये काही भूमाफियांनी नाशिक डायोसेशन ट्रस्ट असो. कंपनी पुनर्जिवीत करणे, कंपनीचा उद्देश सामाजिक बदलून व्यावसायिक करण्यात येणे, याबाबत पोलीसठाणे येथे गुन्हा नोंदवण्यात येणे, तसेच नाशिक सत्र न्यायालयाने

पुनर्जिवीत कंपनीला हस्तक्षेप करण्याचा अधिकार नसल्याचे आदेश देणे, न्यायालयाच्या निर्णयाच्या विरोधात जाऊन अनेक व्यवहार कंपनीकडून केले जाणे, शैक्षणिक संस्थांसह व्यक्तींच्या घरांचा देखील करार करण्यात येणे, अनेक नागरिकांनी आपल्या जीवनाची कमाई गुंतवून मालमत्ता खरेदी करणे, शासकीय जमिनीवर ताबा घेण्याचे प्रकार वाढणे, यात शाळा, शाळांचे मैदान, शासकीय जागा, चर्चची जागा, यासह पोलिस आयुक्तालय असलेल्या जागेवर देखील ताबा घेण्याचा प्रयत्न केला जाणे. उच्च न्यायालयाने हस्तक्षेप केल्यानंतर देखील भूमाफियांच्या मार्फत जागा ताब्यात घेण्याचे प्रकार सुरूच असणे, मोठे आर्थिक गणित असल्यामुळे शासकीय कर्मचारी यात सहभागी असणे, यामुळे नाशिक शहरात दहशतीचे वातावरण निर्माण होणे, अनेक सामान्य माणसांनी केलेल्या गुंतवणुकी धोक्यात येणे, शासकीय जागांचा वापर सामाजिक प्रयोजनासाठी होत नसल्याने शर्तभंग करून या ट्रस्टची व कंपनीची जागा शासन जमा करून घेण्याची आवश्यकता, सदर बाबीकडे शासनाचे होत असलेले दुर्लक्ष, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

**(८) ॲड. राहूल कुल, वि.स.स. पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे जलसंपदा (गोदावरी व कृष्णा खोरे विकास महामंडळ) मंत्र्यांचे लक्ष वेधतील :-**

"जलसिंचनामुळे राज्यातील चिबड जमिनींचे प्रमाण वाढले असल्याने चिबड जमिनी निर्मुलनाची आवश्यकता असणे, पाझरचर, बंदिस्त पझारचर यासाठी मापदंड निश्चित करून पाझरचर निर्मुलनासाठी दौंड तालुक्यात पायलट प्रोजेक्ट राबविण्याचे आदेश देण्यात आले असणे, नदीक्षेत्रातील उक्त जमिन सुधारणेकरीता १००% रक्कम अनुदान देण्याची मागणी, खडकवासला फुरसुंगी बोगदा प्रकल्पाचे काम सुरु असून उक्त काम वेळेत पूर्ण होण्याची आवश्यकता असणे, जनाई शिरसाई उपसासिंचन योजनेच्या कालव्यांना बंदिस्त नलिका वितरण प्रणालीमध्ये रुपांतरण निधीस मंत्रिमंडळाची मान्यता मिळाली असणे, निविदा प्रक्रिया पूर्ण करून काम सुरु करण्याची आवश्यकता असणे, पुरंदर उपसा सिंचन योजनेच्या कुपटेवाडी (भुलेश्वर) येथील वितरिकेच्या वंचित जिरायती भागातील गावांच्या सिंचनासाठी नवीन पाईपलाईनसाठी अंदाजपत्रके तयार करण्यात येणे, त्यास पाणी परवानगी दिली असून निधीसह मान्यता मिळण्याची आवश्यकता असणे, दौंडच्या पूर्वभागातील अनेक गावांतील शेती उजनी धरणाच्या बॅकवॉटरवर अवलंबून असणे, त्याठिकाणी बॅरेजेस बांधण्याची मागणी असणे, मुळा मुठा व भीमा नदीवर बंधाऱ्यांचे स्वयंचलित बॅरेजेसमध्ये रुपांतर करण्याची आवश्यक असणे, मुळशीचे पाणी पूर्वमुखी वळविण्याचा प्रस्तावास टाटा पॉवर यांच्याकडून तत्वतः मान्यता दिली असणे, उक्त सर्व विषयांबाबत मा. मुख्यमंत्री व जलसंपदा मंत्री यांचेकडे दिनांक १२.०२.२०२५, १३.०८.२०२५, ३०.०९.२०२५, ०४.०३.२०२६, २४.०६.२०२६ रोजी बैठका घेऊन देखील कोणताही ठोस निर्णय झाला नसणे, याबाबत शासनाने करायची कार्यवाही व उपाययोजना."

**(९) सर्वश्रीमती सरोज अहिरे, देवयानी फरांदे, वि.स.स. पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्र्यांचे लक्ष वेधतील :-**

"नाशिक शहर परिसरात प्रस्तावित बाह्य रिंगरोड बाह्य परिक्रमामार्ग हा नाशिक शहराचा विकास, वाहतूक नियोजन तसेच आगामी सिंहस्थ कुंभमेळ्याच्या नियोजनाचा अत्यंत महत्त्वाचा प्रकल्प असणे, या प्रकल्पाकरिता देवळाली विधानसभा मतदारसंघातील अनेक गावांतील शेतकऱ्यांची सुपीक, सिंचित शेतीयोग्य जमीन संपादनास येत असल्याने शेतकरी व त्यांच्या कुटुंबीयांच्या उदरनिर्वाहाचा प्रश्न निर्माण झाला असणे, सदर शेतकऱ्यांच्या मोबदल्याबाबत जिल्हाधिकारी नाशिक यांनी अमुस, महसूल यांच्याकडे भूमिधारक शेतकऱ्यांच्या मोबदल्याबाबत मार्गदर्शन मागितले असणे, तसेच भूमिधारकांच्या निवेदनानुसार शासनाने (क) जिल्हा प्रादेशिक आराखडा/कृषी/ना-विकास क्षेत्रांतील भूसंपादन अधिकाऱ्यांना गुणांक घटक=२.०० लागू करण्याबाबत परिपत्रकीय निर्देश देणे आवश्यक असणे, नाशिक रिंग रोड प्रकल्पांतर्गत भूसंपादन करताना विहितगाव व लगतच्या परिसरातील जवळपास सर्वच गटांच्या ७/१२ उताऱ्यावर इतर हक्कात' श्री व्यंकटेश बालाजी मंदिर देवस्थान ट्रस्ट' चे नाव समाविष्ट असल्याचे दिसून येत असणे, या संदर्भात मा.महसूल मंत्री यांनी (प्रकरण क्र.आरटीएस ३०१७/३२७९/ प्र.क्र.२४७/ज-६,आदेश दिनांक २३/०६/२०२२) एक महत्त्वपूर्ण निर्णय दिला असणे, सदर आदेशानुसार संबंधित देवस्थानला सदर जमिनीची मालकी नसून केवळ जमीन Revenue Grant असल्याचे स्पष्ट करण्यात आले असणे, ट्रस्टला भूसंपादन मोबदल्यात कुठल्याही प्रकारचा हिस्सा हक्क नसणे, नाशिक रिंगरोड प्रकल्पातील विहितगाव व इतर गावांतील भूसंपादन प्रकरणात RFCTLARR Act, २०१३ नुसार मोबदला फक्त प्रत्यक्ष शेती करणाऱ्या मूळ भूमिधारक शेतकऱ्यांनाच देण्याबाबत तातडीने स्पष्ट निर्देश देण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने केलेली व करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

**(१०) श्री.चरणसिंग ठाकूर, वि.स.स. पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्र्यांचे लक्ष वेधतील :-**

"काटोल विधानसभा क्षेत्रातील नरखेड, जि.नागपूर येथील ग्रामीण रुग्णालयात गरीब लोकांना आपातकालीन परिस्थितीत उपचाराकरिता नागपूर ते नरखेड हे अंतर ९० कि.मी. असल्याने येथे जाणे शक्य होत नसणे, त्यामुळे अनेकदा त्यांना वेळेवर उपचार न मिळाल्याने लोकांची जीवित हानी होत असणे, नरखेड हा भाग मध्यप्रदेश राज्याच्या लगत असल्याने तेथे आजूबाजूच्या गावातील नागरिकांची या ठिकाणी मोठया प्रमाणात वर्दळ असणे, त्यामुळे नरखेड येथील ३० खाटा क्षमतेच्या ग्रामीण रुग्णालयाचे ५० खाटा क्षमतेच्या उपजिल्हा रुग्णालयामध्ये श्रेणीवर्धन करण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधी (काटोल) यांनी शासनाकडे विनंती केल्यावर त्यास मंजुरी मिळणे, परंतु सदर कामास अद्यापपर्यंत प्रशासकीय

मंजुरी व निधी न मिळाल्याने या कामास अद्याप सुरुवात करण्यात आलेली नसणे, त्यामुळे स्थानिकांमध्ये प्रचंड असंतोष पसरलेला असणे, नरखेड, जि.नागपूर येथील ग्रामीण रुग्णालयाचे रुपांतर उपजिल्हा रुग्णालयात करण्याबाबतच्या प्रस्तावास विशेष बाब म्हणून मंजूरी प्रदान करण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

(११) **डॉ.मिलिंद नरोटे, सर्वश्री. सुधीर मुनगंटीवार, संग्राम जगताप, वि.स.स. तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे मुख्यमंत्र्यांचे लक्ष वेधतील:-**

"राज्यात अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती प्रवर्गातील नागरिकांना संविधानानुसार आरक्षण व विविध शासकीय योजनांचा लाभ देण्यात येत असणे, काही व्यक्तींनी ख्रिश्चन धर्मात धर्मांतरण केल्यानंतरही अनुसूचित जाती अथवा अनुसूचित जमातीचे जात प्रमाणपत्र व जात वैधता प्रमाणपत्र वापरून शासकीय नोकरी, पदोन्नती, निवडणुका तसेच विविध योजनांचा लाभ घेत असल्याच्या तक्रारी अनेक जिल्ह्यांतून निदर्शनास येत असणे, यामुळे मूळ घटकातील गरजू लाभार्थ्यांवर मोठा अन्याय होत असणे, मा. सर्वोच्च न्यायालयाने 'सी. सेल्वाराणी विरुद्ध स्पेशल सेक्रेटरी (२०२४)' आणि 'चिंताडा आनंद विरुद्ध आंध्र प्रदेश राज्य (२०२६)' या प्रकरणांमध्ये याबाबत स्पष्ट निर्देश दिलेले असणे, धर्मांतरणानंतरही आरक्षणाचा लाभ घेणे हे बेकायदेशीर असणे, या बाबीची दखल घेऊन शासनाने प्रचलित अधिनियम व नियमांत तातडीने सुधारणा करण्याची आवश्यकता, त्यामुळे अशा प्रकरणांची विशेष तपासणी मोहीम राबविणे, अपात्र लाभार्थ्यांवर नियमानुसार कारवाई करणे, चुकीच्या पद्धतीने मिळविलेले लाभ परत घेण्याबाबत आवश्यक कार्यवाही करणे, तसेच भविष्यात अशा प्रकरणांना प्रतिबंध करण्यासाठी प्रभावी यंत्रणा उभारण्याची नितांत आवश्यकता, शासनाचे याकडे होत असलेल दुर्लक्ष, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

**( सकाळी ११-०० वाजता )**

**एक : प्रश्नोत्तरे**

**दोन : कागदपत्रे सभागृहाच्या पटलावर ठेवणे -**

(१) **उप मुख्यमंत्री तथा गृहनिर्माण मंत्री** : महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरण यांचा सन २०२४-२०२५ या वर्षाचा वार्षिक प्रशासन अहवाल सभागृहासमोर ठेवतील.

(२) **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** : शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर यांचा सन २०२४-२०२५ या वर्षाचा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतील.

**(३) खनिकर्म मंत्री** : **(क)** जिल्हा खनिज प्रतिष्ठान ठाणे, पालघर, पुणे, सातारा, जालना, हिंगोली, वर्धा व रत्नागिरी या जिल्ह्यांचे सन २०२२-२०२३ ते सन २०२५-२०२६, जिल्हा खनिज प्रतिष्ठान रायगड व लातूर या जिल्ह्यांचे सन २०१६-२०१७ ते सन २०२४-२०२५, जिल्हा खनिज प्रतिष्ठान सिंधुदुर्ग, सांगली, सोलापूर, नंदुरबार, अहिल्यानगर, यवतमाळ व गोंदिया या जिल्ह्यांचे सन २०२३-२०२४ ते सन २०२५-२०२६, जिल्हा खनिज प्रतिष्ठान कोल्हापूर, परभणी, अकोला, अमरावती, नागपूर व गडचिरोली या जिल्ह्यांचे सन २०२२-२०२३ ते सन २०२४-२०२५, जिल्हा खनिज प्रतिष्ठान मुंबई उपनगर व नांदेड या जिल्ह्यांचे सन २०२२-२०२३ व सन २०२३-२०२४, जिल्हा खनिज प्रतिष्ठान चंद्रपूर व धाराशिव या जिल्ह्यांचे सन २०२३-२०२४ व सन २०२४-२०२५, जिल्हा खनिज प्रतिष्ठान नाशिक जिल्ह्याचे सन २०२४-२०२५, जिल्हा खनिज प्रतिष्ठान भंडारा जिल्ह्याचे सन २०२४-२०२५ व सन २०२५-२०२६ तसेच जिल्हा खनिज प्रतिष्ठान बुलढाणा जिल्ह्याचे सन २०१६-२०१७ ते सन २०२२-२०२३ या वर्षांचे वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतील.

**(ख)** महाराष्ट्र राज्य खनिकर्म महामंडळ मर्यादित, नागपूर यांचे सन २०२२-२०२३ व सन २०२३-२०२४ या वर्षांचे वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतील.

**(ग)** महाराष्ट्र पेट्रोकेमिकल्स महामंडळ मर्यादित यांचे सन २०२२-२०२३ व सन २०२३-२०२४ या वर्षांचे वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतील.

**(४) कृषी मंत्री** : डॉ.पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ, अकोला यांचा सन २०२४-२०२५ या वर्षाचा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतील.

(५) **ग्रामविकास व पंचायत राज मंत्री** : **(क)** महाराष्ट्रातील जिल्हा परिषदा व पंचायत समित्यांचे सन २०१९-२०२० चे वार्षिक एकत्रित वित्तीय व महसूली लेखे सभागृहासमोर ठेवतील.

**(ख)** सन २०२१-२०२२ चा महाराष्ट्रातील पंचायती राज संस्थांच्या लेख्यावरील एकावन्नावा लेखापरीक्षा पुनर्विलोकन अहवाल सभागृहासमोर ठेवतील.

**(ग)** सन २०२४-२०२५ चे ठाणे/ रायगड/ रत्नागिरी/ सिंधुदुर्ग/ पालघर/ नाशिक/ धुळे/ नंदुरबार/ जळगांव/ अहिल्यानगर/ पुणे/ सातारा/ सांगली/ सोलापूर/ कोल्हापूर/ छत्रपती संभाजीनगर/ जालना/ परभणी/ हिंगोली/ बीड/ नांदेड/ धाराशिव/ लातूर/ अमरावती/ अकोला/ वाशिम/ बुलढाणा/ यवतमाळ/ नागपूर/ वर्धा/ भंडारा/ गोंदिया/ चंद्रपूर व गडचिरोली या ३४ जिल्हा परिषदांचे वार्षिक प्रशासन अहवाल सभागृहासमोर ठेवतील.

**तीन : स्थगन प्रस्तावाच्या सूचना - (असल्यास) (म.वि.स. नियम ९७ अन्वये)**

**चार : लक्षवेधी सूचना (म.वि.स. नियम १०५ अन्वये) :-**

**(शुक्रवार, दिनांक ३ जुलै, २०२६ रोजी दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेली परंतु पुढे ढकलण्यात आलेली लक्षवेधी सूचना क्रमांक - १)**

(१) **श्री.अजय चौधरी, वि.स.स. पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे उप मुख्यमंत्री (नगरविकास) यांचे लक्ष वेधतील :-**

"मुंबई महानगरपालिकेच्या क्षेत्रात 'फ' दक्षिण विभागामध्ये परळ येथील मालमत्ता विभागाच्या मालकिच्या प्लॉट नं. १३९/१३० वर असलेल्या पवनपुत्र गृहनिर्माण सोसायटीचा पुनर्विकास प्रकल्प मे.जी.आर.एस.शेल्टर्स या विकासकाने बांधला असून विकासकाने प्रकल्पाच्या सुरुवातीस बांधकाम आराखड्यास रहिवाश्यांची मान्यता घेणे, तद्‌नंतर सदर बांधकाम आराखड्यात रहिवाशांना विश्वासात न घेता वारंवार केलेले फेरबदल, सदर सुधारीत आराखड्यात रहिवाशांना यापूर्वी मंजूर केलेल्या सुविधांपासून वंचित ठेवण्यात येणे, विकासकाने बांधकाम करतांना केलेली अनियमितता, महानगरपालिकेचा मालमत्ताकर थकीत ठेवणे, मालमत्ता कर थकीत असतांनाही महानगरपालिकेने सदर विकासकाला विक्री घटकाच्या इमारतीला भोगवटा प्रमाणपत्र देणे, सदर भूखंडावर विकासकाकडून बेकायदेशीर हॉटेल सुरु करण्यात येणे, तसेच विकासकाकडून मूळ रहिवाश्यांना अद्यापही ताबा पत्र देण्यात न येणे, शासनाने या सर्व प्रकरणाची चौकशी करुन संबंधित दोषी विकासकावर कठोर कारवाई करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

**(२) श्री.सत्यजित देशमुख, वि.स.स. पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे मुख्यमंत्र्यांचे लक्ष वेधतील :-**

"राज्यात बहुतांश ग्रामपंचायतींच्या पाणीपुरवठयांची वीजबिले मोठया प्रमाणात थकीत असून महावितरणकडून वारंवार वीज खंडित केली जात असल्याने नागरीकांना सुरळीत पाणीपुरवठा होत नसणे, ग्रामपंचायतीमधील पाणीपुरवठयावरील वाढता खर्च कमी होणेकामी शासनाकडून पाणीपुरवठा योजनेकरीता वित्त आयोगाकडून सोलर पॅनल बसविण्यास ग्रामपंचायतीना परवानगी दिलेली असणे, परंतु ग्रामीण भागात बऱ्याच पाणीपुरवठा योजना ह्या नदीवरुन कार्यान्वित असल्याने त्याठिकाणी पुरामुळे सोलर बसविणे अडचणीचे असणे,तसेच महावितरण कंपनीकडून दिनांक ७.८.२०२५ रोजीचे कमर्शियल सर्क्युलर क्र.३५० नुसार १ मेगावॅट युनिट ओपन ॲक्सेससाठी परवानगी दिलेली असणे, सदर सर्क्युलरमध्ये किलोवॅटचा उल्लेख नसणे, महावितरणचे पोर्टलवर सर्क्युलर ऑनलाईन न दिसणे, तसेच सदर सर्क्युलरमध्ये काही त्रुटी असल्याने ग्रामपंचायतींना पाणीपुरवठयासाठी सोलरची अंमलबजावणी कार्यान्वित करण्यास अनेक समस्यांचा सामना करावा लागत असणे, तसेच लहान वस्त्यांवरील लोकसंख्या कमी असून त्यांचे वास्तव्य पूर्णपणे शेती परिसरात असून त्यांना गावठाणमधून वीजपुरवठा न केल्याने त्यांना हिंस्त्र प्राण्यासह, पाणीटंचाईसह अनेक समस्यांचा सामना करावा लागत असल्याचे निदर्शनास येणे, ग्रामीण भागातील ग्रामपंचायतींना उक्त पाणीपुरवठा योजनेकरीता नदीकाठापासून दूर ग्रामपंचायतीकडे उपलब्ध असलेल्या खुल्या जागेत सोलर बसविण्याची परवानगी देणे, महावितरणच्या सर्क्युलरमध्ये दुरुस्ती होणेकामी उचित आदेश देणे, तसेच शेती परिसरातील छोटया वस्त्यांना कृषी ऐवजी गावठाणमधून कायमस्वरुपी वीज पुरवठा होणेसाठी शासनाने धोरणात्मक निर्णय घेण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही वा उपाययोजना."

**(३) श्रीमती श्वेता महाले, वि.स.स. पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे जलसंपदा (विदर्भ, तापी व कोकण खोरे विकास महामंडळ) मंत्र्यांचे लक्ष वेधतील :-**

"जलसंपदा विभागाच्या दिनांक २० ऑगस्ट २०२४ रोजीच्या शासन निर्णयानुसार वैनगंगा-नळगंगा नदीजोड प्रकल्पास प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात आलेली असणे,प्रस्तावित योजनेनुसार एकूण ३ टप्प्यात ही योजना विभागलेली असणे, टप्पा क्रमांक-३ काटेपूर्णा धरण ते नळगंगा धरण ११४.७२ किमी हा टप्पा बुलढाणा जिल्ह्याशी निगडीत असला तरी बुलढाणा जिल्ह्याची भौगोलिक रचना विचारात घेता बुलढाणा जिल्ह्यातील चिखली, बुलढाणा, मेहकर, देऊळगाव राजा, सिंदखेड राजा, लोणार हे ६ तालुके घाटाच्यावर असल्याने सदर प्रकल्पातून या तालुक्यांना कृषी सिंचन व औद्योगिक वापरासाठी पाणी मिळणे शक्य नसणे, तथापि वैनगंगा-नळगंगा नदीजोड प्रकल्पात बुलढाणा व जालना जिल्ह्यातील अजिंठा डोंगररांगेतून पैनगंगा आणि धामणा नद्यांच्या उगम स्थानाचा समावेश केल्यास बुलढाणा जिल्ह्यातील

पैनगंगा, खडकपूर्णा आणि नळगंगा धरणात कोणत्याही खर्चाशिवाय पाणी पोहचणार असल्याने संपूर्ण बुलढाणा जिल्हा आणि मराठवाड्यातील काही तालुक्यांना कृषी सिंचन व औद्योगिक वापरासाठी पाणी उपलब्ध होऊ शकणार असणे, यामुळे सिंचनाचा अनुशेष असलेला भाग सुजलाम सुफलाम होऊन शेतकऱ्यांची आर्थिक उन्नती साधली जाणार असणे, याकरिता वैनगंगा-नळगंगा नदीजोड प्रकल्पात पैनगंगा नदीचा समावेश करण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची भूमिका."

**(४) सर्वश्री रामदास मसराम, नानाभाऊ पटोले, विकास ठाकरे, अमिन पटेल, अस्लम शेख, डॉ.ज्योती गायकवाड, श्री.साजिद पठाण, डॉ.विश्वजित कदम, डॉ.नितिन राऊत, सर्वश्री. अमित विलासराव देशमुख, अमित झनक, वि.स.स. पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे आदिवासी विकास मंत्र्यांचे लक्ष वेधतील :-**

"गडचिरोली जिल्ह्यातील कोरची तालुक्यात आदिवासी बांधवांच्या आर्थिक व सामाजिक उन्नतीसाठी राबविण्यात येणाऱ्या “धरती आबा भगवान बिरसा मुंडा” योजनेअंतर्गत मंजूर करण्यात आलेल्या विहिरींच्या कामांमध्ये मोठ्या प्रमाणात गैरव्यवहार झाल्याची बाब निदर्शनास येणे, अनेक लाभार्थ्यांच्या नावाने विहिरी मंजूर करून प्रत्यक्षात काम न करता अथवा अपूर्ण काम करून शासनाचा निधी काढण्यात आल्याच्या तक्रारी प्राप्त झालेल्या असणे, पोंगणवाणी येथील लाभार्थी शंकर मडावी तसेच बेलगाव परिसरातील काही प्रकरणांमध्ये काम अपूर्ण असतानाही निधीची संपूर्ण उचल झाल्याचे समोर आले असणे, त्यामुळे आदिवासी विकास विभागाच्या योजनांच्या अंमलबजावणीबाबत गंभीर प्रश्न निर्माण होणे, या प्रकरणाची उच्चस्तरीय चौकशी करून दोषी अधिकारी, कर्मचारी, कंत्राटदार व संबंधितांवर कारवाई करण्यात यावी, तसेच भविष्यात अशा प्रकारचे गैरव्यवहार होऊ नयेत यासाठी प्रभावी नियंत्रण यंत्रणा उभारण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रीया."

**(५) श्री.निलेश राणे, वि.स.स. पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे सांस्कृतिक कार्य मंत्र्यांचे लक्ष वेधतील :-**

"दशावतारी कलाकारांच्या विविध समस्यांबाबत दिनांक २६ मे, २०२५ रोजी मा.सांस्कृतिक कार्य मंत्री यांच्या अध्यक्षतेखाली झालेली बैठक, सदर बैठकीत दशावतार कलेकरिता शासनाकडून मिळणारे अनुदान ख-या कलावतांना मिळावे याकरिता लोककला पॅकेज, याकरिता दशावतार कला प्रकारांची छाननी करण्याकरिता छाननी समिती नेमण्यात येणे, सदर समितीमध्ये चार सदस्यांची केलेली नियुक्ती, प्रयोग अनुदान कलाकारांच्या थेट बँक खात्यावर अदा करण्यात यावे, तसेच कलाकारांची नोंद व ओळखपत्र देण्याकरिता प्रयोगिक तत्वावर सर्वेक्षण करण्यात यावे, त्याचप्रमाणे जिल्हयातील सर्व मंडळाची तपासणीकरिता दोन सदस्यीय समिती नेमण्यात यावी व दोन महिन्यात सर्वेक्षण पूर्ण करुन या समितीचा अहवाल शासनास सादर करण्याबाबत संबंधित विभागांना देण्यात आलेले निर्देश, सदर निर्देशाची अदयाप अंमलबजावणी न होणे, तसेच निर्णय होऊनही कार्यवाही

संथगतीने सुरु असणे, सन २०२५ च्या अधिवेशनात सदर प्रकरणी चर्चा होऊनही ठोस कार्यवाही व योग्य न्याय मिळालेला नसणे, याबाबत शासनाने तातडीने लक्ष घालण्याची आवश्यकता, याकडे शासनाचे होत असलेले अक्षम्य दुर्लक्ष, परिणामी कलाकारांमध्ये पसरलेला असंतोष, याबाबत शासनाने केलेली वा करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

**(६) श्री.जितेश अंतापुरकर, वि.स.स. पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्र्यांचे लक्ष वेधतील :-**

"नांदेड जिल्ह्यातील बिलोली तालुका क्रीडासंकुलाच्या कामासाठी १ कोटी रुपयांचा निधी मंजूर झालेला असतांनाही सार्वजनिक बांधकाम विभागाच्या कार्यकारी अभियंत्यांच्या दुर्लक्षामुळे अद्यापही काम अपूर्ण अवस्थेत असणे, क्रीडा संकुलाच्या कामासंदर्भात निविदा काढतांना तालुका क्रीडा अधिकारी यांना विश्वासात न घेता मनमानी पध्दतीने कार्यकारी अभियंता यांनी निविदा प्रक्रिया पूर्ण केलेली असणे, क्रीडा संकुलाच्या सुरु असलेल्या कामाची माहिती विचारण्यासाठी स्थानिक लोकप्रतिनिधी, क्रीडा अधिकारी यांनी कार्यकारी अभियंता, सा.बा.विभाग यांना दिलेल्या निवेदनाला कोणतेही उत्तर न देता त्यांच्या निवेदनावर कोणतीही कार्यवाही न करणे, कोट्यवधीचा निधी मंजूर होऊनही क्रीडा संकुलाचे काम रखडलेले असणे, परिणामी स्थानिक खेळाडूंमध्ये पसरलेले नैराश्याचे वातावरण, शासनाने सदर प्रकरणी तातडीने पारदर्शक चौकशी करुन दोषी असलेल्या संबंधित कार्यकारी अभियंता यांचेवर कारवाई करण्याची आवश्यकता तसेच तालुका क्रीडा संकुलाचे काम त्वरीत पूर्ण करण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

**पाच : (मंगळवार, दिनांक ७ जुलै, २०२६ रोजीच्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेला म.वि.स. नियम २९३ अन्वये प्रस्ताव)**

**सर्वश्री अमित साटम, रमेश बोरनारे, दिलीप वळसे-पाटील, योगेश सागर, अब्दुल सत्तार, धनंजय मुंडे, अतुल भातखळकर, अर्जुन खोतकर, चेतन तुपे, कालिदास कोळंबकर, दिपक केसरकर, ॲड. माणिकराव कोकाटे, श्रीमती मनिषा चौधरी, डॉ. तानाजी सावंत, श्री. अनिल पाटील, ॲड. पराग अळवणी, सर्वश्री राजेंद्र गावित, धर्मरावबाबा आत्राम, संजय उपाध्याय, विजय शिवतारे, राजकुमार बडोले, मिहीर कोटेचा, राजेश क्षिरसागर, संजय बनसोडे, पराग शाह, प्रदिप जैस्वाल, सर्वश्रीमती सुलभा खोडके, विद्या ठाकूर, डॉ. बालाजी किणीकर, श्री. शेखर निकम, कॅ. आर. तमील सेल्वन, सर्वश्री विलास तरे, प्रताप पाटील-चिखलीकर, राम कदम, चंद्रदीप नरके, डॉ. किरण लहामटे, सर्वश्री रविंद्र चव्हाण, नरेंद्र भोंडेकर, दिलीप बनकर, संजय केळकर, मंगेश कुडाळकर, श्रीमती सरोज अहिरे, सर्वश्री किसन कथोरे, किशोर पाटील, राजेश विटेकर, श्रीमती मंदा म्हात्रे, सर्वश्री शांताराम मोरे, सुनिल शेळके, प्रशांत ठाकूर, प्रकाश सुर्वे, चंद्रकांत नवघरे, महेश चौघुले, निलेश**

**राणे, काशिनाथ दाते, नरेंद्र मेहता, तुकाराम काते, सचिन पाटील, महेश बालदी, अशोक पाटील, मनोज कायंदे, कुमार आयलानी, चंद्रकांत सोनवणे, श्रीमती सना मलिक, सर्वश्री राजन नाईक, बालाजी कल्याणकर, श्रीमती स्नेहा दुबे, श्री. सुहास कांदे, श्रीमती सुलभा गायकवाड, सर्वश्री संजय गायकवाड, हरिश्चंद्र भोये, श्रीमती मंजुळा गावित, सर्वश्री रविशेठ पाटील, महेंद्र थोरवे, सिध्दार्थ शिरोळे, महेंद्र दळवी, प्रविण दटके, चंद्रकांत पाटील, मोहन मते, संतोष बांगर, सुनिल कांबळे, विश्वनाथ भोईर, महेश लांडगे, दिलीप लांडे, ॲड. राहूल कुल, सर्वश्री महेश शिंदे, शंकर जगताप, आमश्या पाडवी, हेमंत रासने, हिकमत उढाण, भिमराव तापकीर, बाबुराव कदम-कोहळीकर, डॉ. संजय कुटे, श्रीमती रंजना जाधव, सर्वश्री रणधीर सावरकर, मुरजी पटेल, सुमित वानखेडे, आनंद तिडके, सुधीर मुनगंटीवार, अमोल पाटील, विनोद अग्रवाल, सुहास बाबर, राजेश बकाने, विलास भुमरे, चरणसिंग ठाकूर, राजेश मोरे, विक्रम पाचपुते, विठ्ठल लंघे, डॉ. मिलिंद नरोटे, सर्वश्री किरण सामंत, बबनराव लोणीकर, राजेंद्र यड्रावकर-पाटील, प्रशांत बंब, शरददादा सोनावणे, अभिमन्यु पवार, डॉ.अशोकराव माने, ॲड. श्रीजया चव्हाण, सर्वश्री सुरेश भोळे, सुरेश धस, अतुलबाबा भोसले, सर्वश्रीमती देवयानी फरांदे, सीमा हिरे, सर्वश्री अनुपभैय्या अग्रवाल, अमोल जावळे, सचिन कल्याण-शेट्टी, गोपिचंद पडळकर, श्रीमती श्वेता महाले, सर्वश्री किशोर जोरगेवार, रत्नाकर गुट्टे, शिवाजी पाटील, श्रीमती मोनिका राजळे, सर्वश्री अक्षय कर्डिले, राघवेंद्र पाटील, सुभाष देशमुख, हरिष पिंपळे, विजय देशमुख, डॉ. सुरेश खाडे, सर्वश्री प्रकाश भारसाकळे, प्रताप अडसड, देवराव भोंगळे, राजेश पवार, श्रीमती नमिता मुंदडा, श्री.जितेश अंतापुरकर, श्रीमती अनुराधा चव्हाण, सर्वश्री रवी राणा, राणाजगजितसिंह पाटील, ॲड. राहुल ढिकले, सर्वश्री अमल महाडिक, समाधान आवताडे, वि.स.स. यांचा म.वि.स. नियम २९३ अन्वये प्रस्ताव : (मंत्र्यांचे उत्तर)**

"मुंबई, ठाणे व कल्याण महानगरपालिकांच्या निवडणूका होऊन महानगरपालिका सभागृहांची स्थापना झाल्यानंतर मागील काही महिन्यांमध्ये महानगरपालिकांच्या प्रशासनात पारदर्शकता व कार्यक्षमता राहण्याच्या दृष्टीने महत्वपूर्ण सुधारणा करण्यात येणे, मुंबई महानगरपालिकेच्या शाळांमधील विद्यार्थ्यांना मोफत देण्यात येणाऱ्या २७ वस्तूंची खरेदी तसेच आरोग्य विभागाची खरेदी 'जेम' पोर्टलमार्फत करण्यात येणे, सुमारे १ हजार कोटींची अनावश्यक निविदा रद्द करण्यात येणे, गारगाई-पिंजाळ जल प्रकल्पाच्या खर्चामधून सुमारे २८० कोटींची बचत करण्यात येणे, महानगरपालिका रुग्णालयांमधील रुग्णसेवा व रुग्णस्थिती प्रणाली ऑनलाईन करण्यात येणे, शहरातील स्वच्छतेस प्रोत्साहन देण्यासाठी 'मुंबई क्लीन लीग' स्पर्धा सुरु करण्यात येणे, मुंबई शहरातील वायू प्रदूषण कमी करण्यासाठी बांधकाम व पाडकाम कचरा (C & D Waste) व्यवस्थापन धोरणाची अंमलबजावणी करण्यात येणे, मुंबई (अंधेरीतील सबवेसह) विविध भागात पावसाळयात साचणाऱ्या पाण्यापासून संरक्षण देण्यासाठी आयआयटी, मुंबईच्या, सहकार्याने सर्वसमावेशक पूरनियंत्रण आराखडा तयार करुन केंद्र शासनाकडे मंजुरीसाठी पाठविण्यात येणे, अंधेरी पूर्व येथे

शासनाचे सुसज्ज रुग्णालय निर्माण करण्याची आवश्यकता, अंधेरी पूर्व येथील सुभाषनगर या झोपडपट्टीत पाणी पुरवठा करण्यासाठी डोंगरमाथ्यावर जलकुंभ बांधण्याची आवश्यकता, मुंबईतील पार्किंग समस्येच्या निराकरणासाठी २७ प्रशासकीय विभागांमध्ये भूमिगत पार्किंग सुविधा करण्याकरिता अर्थसंकल्पात तरतूद करण्यात येणे, १४ वर्षांच्या मुलींना मोफत एचपीव्ही लस देण्याची मोहिम सुरु करण्यात येणे, यावर्षी एल निनोच्या प्रभावामुळे पर्जन्यमान सरासरीपेक्षा कमी राहण्याची शक्यता, तसेच महानगराची लोकसंख्या आणि मिळणारे पाणी यामध्ये ६०० एमएलडीची तफावत असल्याने २०३०-३२ पर्यंत पाण्याची मोठया प्रमाणावर लागणारी आवश्यकता, या बाबी विचारात घेता दीर्घकालीन जलसुरक्षेसाठी पर्यायी जलस्त्रोतांचा शोध घेण्यात येणे, शहरातील नैसर्गिक तलाव, तळी व जलाशय याचे पुर्नरुज्जीवन करणे, तसेच प्रस्तावित डिसॅलिनेशन प्रकल्पाची क्षमता वाढविण्याची आवश्यकता, मुंबई शहरातील वाढत्या घनकचऱ्यांचे शास्त्रोक्त प्रक्रियेद्वारे व्यवस्थापन करुन ‘वेस्ट टु एनर्जी’ तत्वावर वीज निर्मिती प्रकल्पांना चालना देण्याची आवश्यकता, मुंबई महानगरपालिकेतील जन्म व मृत्यू दाखल्याच्या नोंदीमध्ये सुमारे ८७ हजार प्रकरणात फेरफार झाल्याचे व १८ हजार प्रकरणांमध्ये अनियमितता आढळून आल्याचे निदर्शनास येणे, संबंधित दोषींवर कठोर कारवाईची आवश्यकता, मुंबईतील एअरपोर्ट फनल झोन मधील बाधित इमारती तसेच एसआरओ १५० जुहू मिलिटरी ट्रान्समिशन स्टेशन मधील पुनर्विकासाकरिता 'हौसिंग फॉर ऑल' पॉलिसीअंतर्गत संबंधितांना दिलासा देण्यासाठी नियम करणे, खुल्या सार्वजनिक जागांबाबतचे तसेच फेरीवाला क्षेत्राचे धोरण अंतिम करण्याची आवश्यकता, आयआयटी मुंबईच्या सहकार्याने तयार करण्यात आलेल्या पूरनियंत्रण प्रकल्पाची तातडीने अंमलबजावणी करण्याची आवश्यकता, मुंबईतील जवळपास ५० टक्के लोकसंख्या झोपडपट्टीमध्ये असून तेथील स्वच्छता व्यवस्थापनासाठी राबविण्यात येणारी ‘दत्तक वस्ती योजना’ अपेक्षित परिणाम साधण्यात अपयशी ठरत असल्याने त्यात व्यापक सुधारणा करण्याची आवश्यकता, बीडीडी चाळी व धारावी पुनर्विकासाला चालना मिळणे, स्वयं पुनर्विकासाकरिता एक वेगळे प्राधिकरण नेमून त्याची अंमलबजावणी करण्यात येणे, पागडीच्या इमारतींमध्ये राहणाऱ्या रहिवाशांना न्याय देण्याच्या दृष्टीकोनातून करण्यात आलेल्या अधिनियमाची प्रभावी अंमलबजावणी करण्याची आवश्यकता, वांद्रे ते वर्सोवा सीलिंकचे काम सुरु असून वर्सोवा ते भाईंदर या उत्तर दिशेच्या कोस्टल रोडचे काम सुरु असल्यामुळे मुंबई व एमएमआर विभागातील वाहतूकीच्या समस्येचे निवारण होत असणे, साधारणतः ५० टक्के मेट्रोचे काम पूर्ण झाले असून उर्वरित ५० टक्के काम जलदगतीने सुरु असणे, मुंबईची वाहतूक कोंडी सोडविण्याच्या दृष्टीकोनातून मुंबई शहरामध्ये सागरी मार्ग (वॉटरवेज ट्रान्सपोर्ट) सुरु करण्याकरिता स्वतंत्र प्राधिकरणाची स्थापना होणे, क्रांतीनगर ते गोरेगाव या १२० फुटांच्या डीपी रोडचे काम लवकरात लवकर सुरु करण्याची आवश्यकता, कांदळवन क्षेत्रांमध्ये सन २००० पूर्वीपासून वास्तव्यास असलेल्या झोपडपट्टीधारकांना शासनाच्या विद्यमान धोरणानुसार कोणतेही संरक्षण उपलब्ध नसणे, त्यामुळे सदर पात्र झोपडपट्टीधारकांचे पुनर्वसन करण्यासाठी विशेष धोरण निश्चित करुन तात्काळ कार्यवाही करणे आवश्यक असणे, तसेच मुंबई शहराचा सर्वांगीण विकास व मुंबई शहरातील घरकुल योजनांची प्रभावीपणे अंमलबजावणी करण्याच्या दृष्टीकोनातून करावयाची कार्यवाही व उपाययोजना.

**सहा : शासकीय विधेयके :-**

**(अ) "सन २०२६ चे विधानसभा विधेयक क्रमांक ५१ - महाराष्ट्र चिकित्सा आस्थापना (नोंदणी व विनियमन) विधेयक, २०२६" दोन्ही सभागृहाच्या २१ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबतच्या प्रस्तावास विधानपरिषदेच्या सहमतीसंबंधी विधानपरिषदेकडून आलेला संदेश.**

-----------------------------------------------------------------------------------

**(ब) विधानपरिषदेने संमत केल्यास विचार, खंडश: विचार व संमत करणे :-**
**सन २०२६ चे विधानपरिषद विधेयक क्रमांक १७ - भारतीय नागरिक सुरक्षा संहिता (महाराष्ट्र सुधारणा) विधेयक, २०२६**

**सात : (मंगळवार**, **दिनांक ७ जुलै, २०२६ रोजीच्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेला म.वि.स. नियम २९३ अन्वये प्रस्ताव**)

**सर्वश्री विजय वडेट्टीवार, आदित्य ठाकरे, जयंत पाटील, नाना पटोले, भास्कर जाधव, डॉ. जितेंद्र आव्हाड, डॉ. नितिन राऊत, सर्वश्री सुनिल प्रभू, रोहित पवार, अमिन पटेल, दिलीप सोपल, संदिप क्षीरसागर, अस्लम शेख, अजय चौधरी, बापूसाहेब पठारे, अमित देशमुख, डॉ. राहूल पाटील, श्री. रोहित पाटील डॉ. विश्वजित कदम, सर्वश्री कैलास घाडगे-पाटील, उत्तमराव जानकर, अमित झनक, सुनील राऊत, नारायण पाटील, विकास ठाकरे, संजय पोतनीस, अभिजीत पाटील, शिरीषकुमार नाईक, नितीन देशमुख, राजू खरे, संजय मेश्राम, वरुण सरदेसाई, श्रीमती ज्योती गायकवाड, सर्वश्री साजिद खान पठाण, अनंत (बाळा) नर, हेमंत ओगले, हारुन खान, रामदास मसराम, महेश सावंत, अनिल मांगुळकर, प्रविण स्वामी, मनोज जामसुतकर, गजानन लवटे, सिध्दार्थ खरात, संजय देरकर, बाबाजी काळे, वि.स.स. यांचा म.वि.स. नियम २९३ अन्वये प्रस्ताव :- (चर्चा पुढे सुरु व मंत्र्यांचे उत्तर)**.

"राज्यातील विद्यमान सरकार जनतेच्या मूलभूत प्रश्नांवर पूर्णपणे अपयशी ठरले असून विकासाचे दावे केले जात असताना प्रत्यक्षात सर्वसामान्य नागरिकांना रोजच्या जीवनात गंभीर अडचणींचा सामना करावा लागत असणे, राज्यात महावितरणचा कारभार पूर्णपणे कोलमडला असून ग्रामीण भागात कोणतीही पूर्वकल्पना न देता ८ ते १० तास अघोषित लोडशेडिंग केली जाणे, वाढीव आणि चुकीची वीज बिले देऊन सर्वसामान्यांची लूट सुरू असणे, ट्रान्सफॉर्मर (डीपी) जळाल्यास तो बदलून मिळण्यासाठी शेतकऱ्यांना महिनाभर ताटकळत राहावे लागणे, पूर्वसूचनेशिवाय आणि विश्वासात न घेता 'स्मार्ट मीटर' सक्तीने लावण्यात येणे, या स्मार्ट मीटरमुळे वीज बिल दुप्पट-तिप्पट येत असून, रिचार्ज संपताच वीज खंडित होत असणे, नियोजनाचा अभाव असलेल्या शहरीकरणामुळे महानगरे आणि नगरपालिका क्षेत्रांचे रूपांतर कचराकुंडीत झाले असणे, झोपडपट्टी पुनर्वसन योजनेमध्ये करोडो रुपयांचा होत असलेला गैरव्यवहार, बोरीवली नगर भूमापन ६४२ च्या ठिकाणी नगर भूमापन अधिकारी यांना हाताशी धरुन चुकीचा नकाशा तयार करणे आणि एफएसआय वाढवून विकासकास २०० कोटी रुपयांचा फायदा करुन देणे, दिडोंशी येथील पद्मावती नगर येथे सन २०१२ पासून विकासकाने पुनर्वसन न करता ८० घरमालकांना बेघर करणे, मिरा-भाईंदरमधील लोकप्रतिनिधींनी अधिकारांचा दुरुपयोग करुन अनधिकृत बांधकाम

करणे, मुंबईसह प्रमुख शहरांमध्ये टीडीआर नियमावलीत बेकायदेशीर बदल करून ठराविक बिल्डरांना हजारो कोटींचा फायदा देण्यात येणे, धारावी पुनर्वसन प्रकल्पात स्थानिक रहिवासी, छोटे उद्योजक आणि कष्टकऱ्यांना देशोधडीला लावण्याचे कारस्थान सुरू असून अपात्रतेच्या नावाखाली हजारो गोर-गरिबांना मुंबईबाहेर हाकलण्याचा प्रयत्न सुरु असणे, कुर्ला, मुलुंड आणि मुंबईतील इतर मोक्याच्या शासकीय जमिनी प्रकल्पांच्या नावाखाली विकासकांच्या ताब्यात दिल्या जात असणे, रस्त्यांच्या विकासाच्या नावाखाली कोट्यवधी रुपयांचा निधी खर्च दाखवला जात असला, तरी प्रत्यक्षात रस्त्यांची अवस्था अत्यंत दयनीय आणि निष्कृष्ट दर्जाची झालेली असणे, मुंबई-गोवा महामार्गाच्या संपूर्ण चौपदरीकरणाचे काम पूर्णत्वास न गेल्याने कोकणातील पर्यटनावर झालेला परिणाम, मुंबई-गोवा महामार्गासह सागरी महामार्गाचे काम अपूर्ण असताना शासनाने मुंबई ते गोवा ग्रीनफिल्ड हायवेची घोषणा करूनही गेल्या ३ वर्षात त्यावर कोणतीही कार्यवाही न होणे, मोक्याचे आणि कोट्यवधी रुपये किमतीचे शासकीय भूखंड कवडीमोलाने मर्जीतील संस्था आणि उद्योगपतींना बहाल करण्यात येणे, गरिबांच्या घरांसाठी आणि सार्वजनिक सुविधांसाठी राखीव असलेल्या जमिनींची खुली लूट सुरु असणे, राज्यात विशेषत: बीड आणि सांगली जिल्ह्यातील हिंदू देवस्थान इनाम व वक्फ जमिनींच्या प्रकरणात कोट्यवधी रुपयांचा घोटाळा झालेला असणे, या घोटाळ्याची चौकशी करण्याची मागणी वारंवार लोकप्रतिनिधींकडून करण्यात येणे, मौजे चिंचपूर तालुका आष्टी, जिल्हा बीड येथील इनाम दर्गाह जमीन हस्तांतरण प्रकरण महसूल विभागाने जाणीवपूर्वक पुनर्निरीक्षणातून वगळले असणे, देवस्थान जमिनी घोटाळ्यांवर अद्याप पर्यंत न झालेली कारवाई, मीरा भाईंदर तसेच येऊर जिल्हा ठाणे येथील आदिवासी जमिनींचा गैरव्यवहार, तक्रार करून देखील अद्याप पर्यंत न झालेली कारवाई, सरकारची परवानगी न घेता आदिवासींच्या जमीनी हडप करणे, भिवंडी येथील भूमी वर्ल्ड या विकासकाने शासकीय जमिनीवर अतिक्रमण करून शॉपिंग मॉल उभारणे, तक्रार करून देखील अद्याप पर्यंत न झालेली कारवाई, महाराष्ट्रात वारंवार उघडकीस येत असलेले विविध प्रकारचे जमीन घोटाळे त्या अनुषंगाने शासनाने करावयाची कार्यवाही."

**आठ : (मंगळवार, दिनांक ७ जुलै, २०२६ रोजीच्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेला म.वि.स. नियम २९३ अन्वये प्रस्ताव)**

**श्रीमती देवयानी फरांदे, सर्वश्री रमेश बोरनारे, दिलीप वळसे-पाटील, प्रशांत बंब, अब्दुल सत्तार, धनंजय मुंडे, सिध्दार्थ शिरोळे, अर्जुन खोतकर, चेतन तुपे, योगेश सागर, दिपक केसरकर, ॲड. माणिकराव कोकाटे, श्री. अमल महाडिक, डॉ. तानाजी सावंत, सर्वश्री अनिल पाटील, रणधीर सावरकर, राजेंद्र गावित, राजकुमार बडोले, सुधीर मुनगंटीवार, विजय शिवतारे, धर्मरावबाबा आत्राम, श्रीमती सीमा हिरे, सर्वश्री राजेश क्षिरसागर, संजय बनसोडे, रविंद्र चव्हाण, प्रदिप जैस्वाल, श्रीमती सुलभा खोडके, श्री. अमित साटम, डॉ. बालाजी किणीकर, सर्वश्री शेखर निकम, संजय उपाध्याय, विलास तरे, प्रतापराव पाटील-चिखलीकर, सत्यजित देशमुख, चंद्रदीप नरके, डॉ. किरण लहामटे, सर्वश्री संजय केळकर, नरेंद्र भोंडेकर, दिलीप बनकर, सुभाष देशमुख, मंगेश कुडाळकर, श्रीमती सरोज अहिरे, सर्वश्री विक्रम पाचपुते, किशोर पाटील, राजेश विटेकर, श्रीमती विद्या ठाकूर, सर्वश्री शांताराम मोरे,**

**सुनिल शेळके, डॉ. राहूल आहेर, सर्वश्री प्रकाश सुर्वे, चंद्रकांत नवघरे, अतुल भातखळकर, निलेश राणे, काशिनाथ दाते, श्रीमती मनिषा चौधरी, सर्वश्री तुकाराम काते, सचिन पाटील, ॲड. पराग अळवणी, सर्वश्री अशोक पाटील, मनोज कायंदे, मिहीर कोटेचा, चंद्रकांत सोनवणे, श्रीमती सना मलिक, सर्वश्री नारायण कुचे, बालाजी कल्याणकर, शंकर मांडेकर, अभिमन्यु पवार, सुहास कांदे, राजू कारेमोरे, राजेश पवार, संजय गायकवाड, प्रशांत ठाकूर, श्रीमती मंजुळा गावित, सर्वश्री किसन कथोरे, महेंद्र थोरवे, महेश बालदी, महेंद्र दळवी, संभाजी पाटील-निलंगेकर, चंद्रकांत पाटील, ॲड. श्रीजया चव्हाण, सर्वश्री संतोष बांगर, महेश चौघुले, विश्वनाथ भोईर, राजन नाईक, दिलीप लांडे, श्रीमती स्नेहा दुबे, सर्वश्री महेश शिंदे, राम कदम, आमश्या पाडवी, कालिदास कोळंबकर, हिकमत उढाण, कॅ. आर. तमील सेल्वन, सर्वश्री बाबुराव कदम-कोहळीकर, पराग शाह, अमोल खताळ, शिवाजी पाटील, श्रीमती रंजना जाधव, सर्वश्री रत्नाकर गुट्टे, आनंद तिडके, मंगेश चव्हाण, मुरजी पटेल, राघवेंद्र पाटील, अमोल पाटील, विजय देशमुख, सुहास बाबर, महेश लांडगे, विलास भुमरे, ॲड. राहूल कुल, सर्वश्री राजेश मोरे, सुनिल कांबळे, विठ्ठल लंघे, भिमराव तापकीर, किरण सामंत, शंकर जगताप, राजेंद्र यड्रावकर-पाटील, समाधान आवताडे, शरददादा सोनावणे, गोपिचंद पडळकर, डॉ.अशोकराव माने, श्री. सचिन कल्याण-शेट्टी, डॉ.अतुलबाबा भोसले, सर्वश्री देवेंद्र कोठे, हेमंत रासने, चैनसुख संचेती, श्रीमती श्वेता महाले, डॉ. संजय कुटे, सर्वश्री प्रताप अडसड, प्रविण दटके, प्रकाश भारसाकळे, हरिष पिंपळे, जितेश अंतापुरकर, राजू तोडसाम, सुमित वानखेडे, उमेश यावलकर, किसन वानखेडे, प्रविण तायडे, मोहन मते, बंटी भांगडिया, समीर कुणावार, चरणसिंग ठाकूर, डॉ. मिलिंद नरोटे, सर्वश्री किशोर जोरगेवार, राजेश बकाने, विनोद अग्रवाल, करण देवतळे, सुरेश धस, संतोष दानवे, समीर मेघे, श्रीमती नमिता मुंदडा, सर्वश्री रमेश कराड, नरेंद्र मेहता, श्रीमती मंदा म्हात्रे, श्री. दिलीप बोरसे, डॉ. सुरेश खाडे, ॲड. राहुल ढिकले, सर्वश्री अमोल जावळे, काशिराम पावरा, राजेश पाडवी, मनोज घोरपडे, अक्षय कर्डिले, राहुल आवाडे, श्याम खोडे, राजेश वानखडे, कृष्णा खोपडे, विजय रहांगडाले, डॉ. आशिष देशमुख, सर्वश्री देवराव भोंगळे, राणाजगजितसिंह पाटील, रवी राणा, डॉ. तुषार राठोड, सर्वश्री तानाजी मुटकुळे, कुमार आयलानी, रविशेठ पाटील, श्रीमती सुलभा गायकवाड, सर्वश्री हरिश्चंद्र भोये, सुरेश भोळे, सुधीर गाडगीळ, श्रीमती सई डहाके, सर्वश्री केवलराम काळे, संजय पुराम, भीमराव केराम, श्रीमती अनुराधा चव्हाण, वि.स.स. यांचा म.वि.स. नियम २९३ अन्वये प्रस्ताव :- (चर्चा पुढे सुरु व मंत्र्यांचे उत्तर)**

"विद्यार्थी हे आपल्या देशाचे भवितव्य, राष्ट्राची संपत्ती व उद्याची उमेद आहे या विचाराने प्रेरित होऊन राज्यातील विद्यार्थ्यांना गुणवत्तापूर्ण, दर्जेदार आणि कमी खर्चात उच्च शिक्षण उपलब्ध करण्याच्या दृष्टीने व शिक्षण हे जीवननिर्मित, मानवनिर्मित आणि चारित्र्यसंपन्न व्यक्तिमत्व निर्माण करणारे व्हावे यादृष्टीने देशाचे मा. पंतप्रधान यांच्या नेतृत्वाखाली केंद्र शासनाने केलेल्या "राष्ट्रीय शैक्षणिक धोरण (एनईपी) २०२०" या धोरणाची अंमलबजावणी डॉ.रघुनाथ माशेलकर यांच्या अध्यक्षतेखाली स्थापन केलेल्या कार्यबल गटामार्फत राज्यात सुरु असणे, या धोरणाच्या अंमलबजावणीस गती देण्यासाठी आणि धोरणात्मक निर्णय

घेण्यासाठी सुकाणू समिती गठीत करण्यात आली असणे, राष्ट्रीय शैक्षणिक धोरण, २०२० अंतर्गत महाविद्यालयांना/विद्यापीठांना मार्गदर्शन करण्यासाठी कार्यबल गठीत केला असणे, सीईटीच्या माध्यमातून नवीन वेब पोर्टल विकसित करण्यात आले असणे, राज्यातील महाविद्यालयांमध्ये रिक्त असलेली प्राचार्य व ग्रंथपाल इत्यादी २२३ पदे भरण्यास मान्यता दिली असणे, अभिमत विद्यापीठांकरिता शैक्षणिक शुल्क शिष्यवृत्तीची योजना लागू करण्यात येणे, नागपूर येथील महाराष्ट्र राष्ट्रीय विधी विद्यापीठातील सुविधांसाठी २५ कोटी ८५ लाख रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला असणे, कोविड-१९ मुळे पालक गमावलेल्या विद्यार्थ्यांचे शिक्षण पूर्ण होईपर्यंत संपूर्ण शुल्क माफ करण्याचा निर्णय घेण्यात येणे, राज्यातील विद्यापीठे व उच्च शिक्षण संस्थांमध्ये गुणात्मक बदल करण्यासाठी 'परीसस्पर्श' योजना राबविण्याचा निर्णय घेण्यात येणे, वाचन संस्कृती वृध्दींगत करण्यासाठी राज्यात 'वाचन संकल्प महाराष्ट्राचा' हा अनोखा उपक्रम राबविण्यात येणे, राज्याच्या उच्च शिक्षणाच्या गुणवत्ता वाढीसाठी देशातील व परदेशातील विविध शैक्षणिक संस्था व औद्योगिक संस्थांसोबत सामंजस्य करार करण्यात आले असणे, राज्यातील ३५ विद्यापीठे आणि १९४९ महाविद्यालये अश्या एकूण १९८४ शैक्षणिक संस्थांचे नॅक मूल्यांकन व पुनर्मूल्यांकन पूर्ण होऊन राज्य देशामध्ये प्रथम क्रमांकावर असणे, मराठीचा माध्यम भाषा म्हणून विकास करण्यासाठी आवश्यक ते संशोधन, परिभाषा निर्मिती, भाषांतर प्रकल्प व अद्ययन सामग्री निर्मितीचे सखोल आकलन याकरिता रिध्दपूर, जि.अमरावती येथे मराठी भाषा विद्यापीठाची स्थापना करण्यात येणे, ईबीसी, ईडब्ल्यूएस, एसईबीसी व ओबीसी प्रवर्गातील पात्र विद्यार्थीनींना महाविद्यालयीन शिक्षणशुल्क व परिक्षाशुल्कांच्या संपूर्ण रक्कमेची प्रतिपूर्ती करण्याची योजना शैक्षणिक वर्ष २०२४-२५ पासून लागू करण्यात आली असणे, सार्वजनिक विद्यापीठे व संलग्न महाविद्यालयातील विद्यार्थ्यांसाठी जीवन/अपघात विमा योजना लागू करण्यात आली असणे, राज्यातील वरिष्ठ महाविद्यालये/विद्यापीठांमधील अध्यापकांना 'महाराष्ट्र राज्य अध्यापक विकास संस्था, पुणे' यांच्यामार्फत उजळणी प्रशिक्षण वर्गांचे आयोजन करण्यात येणे, यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठामार्फत 'महाज्ञानदीप' हा क्रांतिकारी डिजिटल ऑनलाईन अभ्यासक्रम उच्चशिक्षणासाठी समर्पित पोर्टल म्हणून विकसित करण्यात आला असणे, उच्च शिक्षण घेणाऱ्या आणि तंत्रशिक्षण प्राप्त विद्यार्थ्यांना स्टार्टअप, मेक इन इंडिया आणि महाराष्ट्र स्टार्टअप निधी लागू करण्यात येणे, महा-एआय इनोव्हेशन सेंटरद्वारे विद्यापीठे, संशोधन संस्था व उद्योग यांनी डिजिटल प्लॅटफॉर्म निर्माण केला असणे, शासनाच्या संबंधित विभागात लोकप्रतिनिधींना मिळणाऱ्या वागणूकीत अधिक सुधारणा होण्याची आवश्यकता, नवी मुंबईला आंतरराष्ट्रीय विमानतळाजवळ ५ परदेशातील विद्यापीठे एकत्र येऊन 'एज्युसिटी' निर्माण झाली असणे, परिणामी परदेशातील अभ्यासक्रम भारतातील विद्यार्थ्यांना आपल्या देशातच उपलब्ध होणार असणे, नवीन संच मान्यतेच्या निकषांमुळे राज्यात मोठया प्रमाणात शिक्षकांची पदे अतिरिक्त होणे, राज्यातील सीबीएसई/आयसीएसई शाळांवर राज्य शासनाचे नियंत्रण आवश्यक असल्याचे निदर्शनास येणे, राज्यातील विद्यार्थ्यांना जागतिक स्तरावर चांगले शिक्षण आणि संशोधन व अनुभव मिळण्याकरिता राज्य शासन परदेशीय विद्यापीठांशी भागीदारी वाढविण्याचा प्रयत्न करित असणे इ. शैक्षणिक धोरणांतर्गत राज्य शासन करित असलेली कार्यवाही व उपाययोजना विचारात घेण्यात यावी."

**नऊ : अर्धा-तास चर्चा (म.वि.स. नियम ९४ अन्वये) :-**

**(मंगळवार, दिनांक ७ जुलै, २०२६ रोजीच्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेल्या परंतु पुढे ढकलण्यात आलेल्या अर्धा-तास चर्चेच्या सूचना) (क्रमांक १ ते ११)**

**(१) श्री.रईस शेख, वि.स.स.**

"भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिकेची आर्थिक स्थिती खालावल्याबाबत" या विषयावरील श्री. रईस शेख, वि.स.स. यांचा दिनांक १८ मार्च, २०२६ रोजी सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आलेल्या अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी क्रमांक २४ मधील प्रश्न क्रमांक १९१९ ला दिलेल्या उत्तराच्या संदर्भात अर्धा-तास चर्चा उपस्थित करतील.

**(२) श्री. विजय वडेट्टीवार, वि.स.स.**

"भुसावळ (दीपनगर) (जि.जळगांव) तालुक्यातील औष्णिक विद्युत केंद्रात 'पॉड ॲश' विक्री लिलाव प्रक्रियेमध्ये झालेली अनियमितता" या विषयावरील श्री. सुरेश (राजूमामा) भोळे, वि.स.स. यांचा तारांकित प्रश्न क्रमांक ३१७१३ ला दिनांक २४ मार्च, २०२६ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात अर्धा-तास चर्चा उपस्थित करतील."

**(३) श्री. सुभाष देशमुख, वि.स.स.**

"सोलापूर मधील महानगरपालिकेचे महात्मा गांधी प्राणीसंग्रहालय बंद असल्याबाबत" या विषयावरील श्री. सुभाष देशमुख व इतर वि.स.स. यांचा दिनांक १८ मार्च, २०२६ रोजी सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आलेल्या अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी क्रमांक ३३ मधील प्रश्न क्रमांक २८३० ला दिलेल्या उत्तराच्या संदर्भात अर्धा-तास चर्चा उपस्थित करतील."

**(४) श्री. आशुतोष काळे, वि.स.स.**

"राज्यातील जलजीवन मिशन योजनेची कामे अपूर्ण असल्याबाबत" या विषयावरील श्री. भास्कर जाधव, वि.स.स. यांचा तारांकित प्रश्न क्रमांक ३२५२२ ला दिनांक २४ जून, २०२६ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात अर्धा-तास चर्चा उपस्थित करतील."

**(५) श्री. अस्लम शेख, वि.स.स.**

"राज्यात मत्स्यव्यवसाय सहकारी संस्थांना लागू असलेल्या "बल्क ग्राहक" डिझेल वर्गीकरणात बदल करणेबाबत" या विषयावरील श्री. अस्लम शेख, वि.स.स. यांचा तारांकित प्रश्न क्रमांक ३३१२२ ला दिनांक २५ जून, २०२६ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात अर्धा-तास चर्चा उपस्थित करतील."

**(६) श्री. विलास भुमरे, वि.स.स.**

"छत्रपती संभाजीनगर तालुक्याचे तहसीलदार यांनी इनाम जमीन व गौण खनिज उत्खनन वाहतुकीमध्ये केलेला गैरव्यवहार" या विषयावरील श्री. विलास भुमरे, वि.स.स. यांचा तारांकित प्रश्न क्रमांक ११६९० ला दिनांक ११ जुलै, २०२५ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात अर्धा-तास चर्चा उपस्थित करतील."

**(७) श्री. सुधीर मुनगंटीवार, वि.स.स.**

"राज्यात गोवंश तस्करीचे प्रमाण वाढल्याबाबत" या विषयावरील श्री. प्रविण तायडे व इतर वि.स.स. यांचा तारांकित प्रश्न क्रमांक ३४४६९ ला दिनांक २३ जून, २०२६ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात अर्धा-तास चर्चा उपस्थित करतील."

**(८) श्री.राजेश पवार, वि.स.स. पुढील सार्वजनिक महत्वाच्या बाबीबर चर्चा उपस्थित करतील.**

"नांदेड शहरात वारंवार विद्युत पुरवठा खंडित होणे, याबाबत महावितरणकडून तांत्रिक कारण दिले जात असून यावर कायमस्वरूपी उपाययोजना करण्यास महावितरण अपयशी ठरणे, पावसाळा किंवा वाऱ्याच्या वेळी वीजपुरवठा खंडित होऊ नये यासाठी लाईन मेंटेनन्स व इन्फ्रास्ट्रक्चर मजबूत करण्यासाठी निधीची असलेली आवश्यकता, नांदेड शहरासाठी सर्व विभागांचा समन्वय साधून (महानगरपालिका, वाहतूक पोलीस, महावितरण) संयुक्त कृती आराखडा तयार करण्याची आवश्यकता, शहरातील नागरिकांकडून येणाऱ्या तक्रारींचे निवारण करण्यासाठी डिजिटल/ ऑनलाइन प्रणाली कार्यरत करुन त्या तक्रारींचे निवारणही वेळेत करण्याची आवश्यकता, शहराच्या वाढत्या लोकसंख्येच्या पार्श्वभूमीवर मूलभूत नागरी सुविधांच्या उभारणीसाठी शासनाने दीर्घकालीन योजना (Long term Master Plan) तयार करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

**(९) श्री.प्रशांत बंब, वि.स.स. पुढील सार्वजनिक महत्वाच्या बाबीबर चर्चा उपस्थित करतील.**

"सध्या मुलींसाठी विवाहाचे किमान कायदेशीर वय १८ वर्षे आणि मुलांसाठी २१ वर्षे असणे, या वयात मोठ्या प्रमाणावर युवक युवती उच्च शिक्षण घेत असणे, कौशल्य विकासाच्या प्रक्रियेत असणे, किंवा आर्थिक दृष्ट्या स्वावलंबी झालेले नसणे, विवाह ही केवळ दोन व्यक्तींची वैयक्तिक निवड नसून ती आयुष्यभराची सामाजिक आर्थिक कौटुंबिक आणि कायदेशीर जबाबदारी असणे,अलीकडच्या काळात राज्यात पालकांच्या संमतीशिवाय घरातून निघून जाऊन विवाह करण्याच्या घटनांमध्ये झालेली वाढ, अशा विवाहांपैकी अनेक विवाह हे भावनिक आवेग, अल्प जीवनानुभव, अपुरी आर्थिक क्षमता, अपूर्ण शिक्षण आणि वैवाहिक जीवनाविषयी पुरेशी समज नसणे, पालकांच्या विरोधामुळे बेपत्ता तक्रारी अपहरणाचे गुन्हे, धमक्या, मारहाण, हत्ये सदृश्य घटना आणि कायदा सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होणे, पळून जाऊन लग्न केल्यामुळे पालकांना सामाजिक अपमान, मानसिक धक्का, आर्थिक नुकसान होणे, मुलींचे

लग्नाचे वय १८ व मुलांचे २१ वर्षे असावे. परंतू मुला मुलींना मर्जीने लग्न करायचे असल्यास व पालकांचा त्यांना विरोध असल्यास मुलीचे किमान विवाहाचे वय १८ वरून २१ वर्षे व मुलाचे किमान विवाहाचे वय २१ वरून २४ वर्षे करण्याबाबत कायदेशीर बंधने करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

**(१०) श्री.सुधीर मुनगंटीवार, वि.स.स. पुढील सार्वजनिक महत्वाच्या बाबीबर चर्चा उपस्थित करतील.**

"राज्यातील चंद्रपूर, गडचिरोली, भंडारा, गोंदिया तसेच नागपूर हे धान उत्पादनासाठी प्रसिद्ध जिल्हे असून या भागातील लाखो शेतकरी प्रामुख्याने धान पिकावर अवलंबून असणे, या जिल्ह्यांच्या कृषी अर्थव्यवस्थेचा मुख्य कणा म्हणून धान पीक ओळखले जाते, तथापि, गेल्या काही वर्षांत हवामानातील अनिश्चितता, अवकाळी पाऊस, अतिवृष्टी, रोगराई तसेच उत्पादन खर्चात सातत्याने होत असलेली वाढ यामुळे या भागातील शेतकरी गंभीर आर्थिक संकटात सापडणे, दिनांक २५ मार्च २०२६ रोजी महाराष्ट्र विधानसभेत अंतिम आठवडा प्रस्तावावरील चर्चेला उत्तर देताना मा. मुख्यमंत्री यांनी धान उत्पादक शेतकऱ्यांना प्रोत्साहनपर रक्कम देण्याबाबत राज्य शासन सकारात्मक असल्याचे सभागृहात स्पष्टपणे नमूद करणे, यासाठी आवश्यक प्रक्रिया पूर्ण करून लवकरच अधिकृत निर्णय जाहीर करण्यात येईल, असे आश्वासन देणे, मात्र, आजपर्यंत या संदर्भातील अंतिम निर्णय जाहीर झालेला नसल्याने धान उत्पादक शेतकऱ्यांमध्ये तीव्र अस्वस्थता निर्माण होणे, धान पिकाच्या लागवडीसाठी शेतकऱ्यांना बियाणे, खते, कीडनाशके, सिंचन, डिझेल, मजुरी, काढणी व मळणी यासाठी मोठ्या प्रमाणावर खर्च करावा लागणे, उत्पादन खर्च सातत्याने वाढत असताना शेतकऱ्यांना मिळणारा हमीभाव हा प्रत्यक्ष खर्चाच्या तुलनेत अपुरा ठरत असणे, परिणामी अनेक शेतकरी कर्जबाजारी झाले असून उत्पादन विक्रीनंतरही अपेक्षित आर्थिक परतावा मिळत नसणे, शासकीय खरेदी केंद्रांवरील विलंब, ऑनलाइन नोंदणीतील तांत्रिक अडचणी, ओलावा निकषांची कठोर अंमलबजावणी तसेच वेळेवर देयके न मिळाल्याने शेतकऱ्यांच्या हाल अपेष्टा अधिकच वाढलेल्या असणे, अनेक शेतकरी खाजगी व्यापाऱ्यांना कमी दराने धान विकण्यास बाध्य होणे, या पार्श्वभूमीवर चंद्रपूर, गडचिरोली, भंडारा, गोंदिया व नागपूर जिल्ह्यातील धान उत्पादक शेतकऱ्यांनी प्रति हेक्टर २०,००० रुपये प्रोत्साहनपर रक्कम देण्याची मागणी शासनाकडे सातत्याने केलेली असणे, सदर रक्कम मिळाल्यास शेतकऱ्यांना कर्जफेड, पुढील हंगामाची तयारी, शेतीसाठी आवश्यक निविष्ठांची खरेदी तसेच कुटुंबाच्या मूलभूत गरजा भागविण्यास मोठा आधार मिळणे, सदर विषय सार्वजनिक दृष्टया अत्यंत महत्त्वाचा असून राज्यातील विशेषतः चंद्रपूर, गडचिरोली, भंडारा, गोंदिया व नागपूर जिल्ह्यातील लाखो धान उत्पादक शेतकऱ्यांच्या आर्थिक हिताशी थेट संबंधित असल्यामुळे विधानसभेत दिलेल्या आश्वासनाची तातडीने पूर्तता करून धान उत्पादक शेतकऱ्यांना प्रति हेक्टर २०,००० रुपये प्रोत्साहनपर रक्कम जाहीर करावी व ती थेट शेतकऱ्यांच्या खात्यात जमा करावी अशी जनतेकडून व लोकप्रतिनिधींकडून होत असलेली मागणी, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

**(११) श्री.जयंत पाटील, वि.स.स. पुढील सार्वजनिक महत्वाच्या बाबीबर चर्चा उपस्थित करतील.**

"सन २०१४-१५ मध्ये रु. ३१५ कोटींची उलाढाल व रु.५० कोटींचा नफा कमावणाऱ्या हाफकिन महामंडळाची उलाढाल गेल्या ६-७ वर्षांत घसरून केवळ रु.७८ कोटींवर आली असून, महामंडळाला रु.४० कोटींचा तोटा झाला असणे, नियंत्रक व महालेखापरीक्षक (CAG) यांच्या २०२३-२४ च्या अहवालानुसार, तत्कालीन जबाबदार अधिकारी यांनी रु.२०० कोटींच्या पोलिओ टेंडरमध्ये घोटाळा करणे, रु.६१ कोटींचा कस्टम भुर्दंड बसवणे आणि केंद्र सरकारचा Venom व कोविड प्रकल्पांचा निधी परत पाठवून महामंडळाचे अतोनात नुकसान केल्याचे सिध्द होणे, महामंडळातील अंतर्गत गैरकारभारामुळे गेल्या ३ वर्षांत तब्बल २० ते २२ व्यवस्थापकीय संचालक (MD) बदलले गेले असणे, CAG' अहवालात दोषी सिद्ध झालेल्या संबंधित अधिकाऱ्यांवर फौजदारी गुन्हे दाखल करून कारवाई करण्याची आवश्यकता, महामंडळाच्या व्यवस्थापकीय संचालक पदावर पूर्णवेळ आय.ए.एस. (IAS) अधिकाऱ्याची नियुक्ती करण्याची आवश्यकता, सध्या कच्च्या मालाअभावी उत्पादन ठप्प असल्याने, खेळते भांडवल (Working Capital) म्हणून शासनाने तातडीने विशेष आर्थिक मदत उपलब्ध करून देण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

**विधान भवन :**
मुंबई,
दिनांक : ७ जुलै, २०२६.

**जितेंद्र भोळे,**
सचिव-१,
महाराष्ट्र विधानसभा.